# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३३१** **दिनांक २७/११/२०२१**

## हायवा ट्रक चोरी करणा-या आंतरराज्य टोळी सदस्यांना गुन्हे शाखा कक्ष -3 कडुन अटक.

तक्रारदार श्री. दिपक नरेश किणी, वय- ४३ वर्षे, व्यवसाय- बिल्डींग मटेरियल सप्लायर, रा. वास्तल्य पहीला माळा, साईबाबा मंदिरच्या मागे, डोंगरपाडा विरार पश्चिम ता. वसई जि. पालघर यांनी त्यांचे मालकीचा टाटा कंपनीचा हायवा ट्रक क्र. एम. एच. ४८ एवाय. ६४६४ हा गडगा पाडा, विरार पुर्व ता. वसई जि. पालघर येथे पार्क करुन ठेवला असता, दिनांक १२/१२/२०२० रोजीचे रात्रौ ०८.०० ते दिनांक १४/१२/२०२० दुपारी १२.३० वा चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्वतःचे फायद्याकरिता उघड्यावरुन चोरी करुन चोरुन नेला होता बाबत विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं. १०५०/२०२० भा.द.वी.सं. कलम ३७९ अन्वये दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हा करण्याची पध्दत व तांत्रीक विश्लेषणावरुन आरोपीत नामे - १) अमनदिप ऊर्फ जसप्रित उजागर सिंग रा. कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड. २) बलजीतसिंग कल्याण सिंग सासन वय - ५८ वर्षे, रा. सेक्टर १२, कळंबोली गॅनमंदिर स्कुल, कळंबोली, नवी मुंबई, ३) इब्राहीम समद खान वय - ४२ वर्षे, रा., वडजाई रोड, ता.जि. धुळे. ४) सचिन सुर्यकांत विभुते वय - ३८ वर्षे, रा. मोहाडी, उप नगर धुळे, जि. धुळे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेला २०,००,०००/- लाख रुपये किंमतीचा हायवा ट्रक हस्तगत केला आला आहे.

वरिल आरोपीपैकी अमनदिप ऊर्फ जसप्रित उजागर सिंग याचेविरुध्द मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, अहमदनगर, रायगड तसेच पंजाब राज्यात चारचाकी वाहन चोरीचे ३० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहे.

वरील कामगिरी श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्रीमती पद्मजा बडे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पोउपनिरी. शिवाजी खाडे, पो.ना. मनोज चव्हाण, पो.ना. प्रदीप टक्के, पो.ना. सागर बारवकर, पो.ना. मनोज सकपाळ, पो.ना. सचिन घेरे, पो.शि. अश्विन पाटील सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

---ooo---